

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंती निमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात उपस्थित मराठी विभाग प्रमुख डॉ.बी.एस.गायकवाड, कार्यक्रमाचे व्याख्याते इतिहास विभाग प्रमुख डॉ.एस.जी.बेंजलवार, डॉ.सचिन बसुदे, डॉ.विठ्ठल सांडूर, प्रा.श्रीकृष्ण दिवे व इतर

## दिनांक ०३/०८/२०२४

# महाराष्ट्र महाविद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील जयंतीनिमित्त अभिवादन व अवयव दान प्रतिज्ञा

**निलंगा । प्रतिनिधी**

येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व मराठी विभागाच्या वतीने क्रांती सिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एन. कोलपुके यांच्या हस्ते क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.सुभाष बेंजलवार यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाची व स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय कारकिर्दीची माहिती थोडक्यात सांगितली. ते म्हणाले की, क्रांतिसिंह नाना पाटील हे ब्रिटिशांच्या सनदी सेवेमध्ये तलाठी म्हणून कार्यरत होते परंतु त्यांनी महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंग चळवळीच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला त्यांनी जवळपास आठ ते दहा वेळा भारताच्या स्वातंत्र्यासाठी



तुरुंगवासही भोगला. १९४२ च्या छोडो भारत चळवळी दरम्यान क्रांतिसिंह नाना पाटील यांनी आपुला आपण करावा कारभार या उक्तीप्रमाणे प्रतिसरकारची स्थापना करून महाराष्ट्रात ब्रिटिश सरकार समोर एक सक्षम शासन व्यवस्था निर्माण केली. त्यानंतर गत लोक न्यायालय,आर्थिक व्यवस्था, शासकीय, प्रशासकीय व्यवस्था एवढेच नव्हे तर सेनादल सुद्धा त्यांनी उभारले आणि ब्रिटिश सरकारला आव्हान दिले. हे त्यांचे कार्य तत्कालीन क्रांतीकार्य म्हणून लक्षात घेतले गेले. सर्वसामान्य लोकांमध्ये भारताच्या स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य नाना पाटील यांनी केले असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बरोबरच आजच्या दिवशी अवयवादानाच्या जागृती संदर्भात अवयवदान प्रतिज्ञा ही विद्यार्थ्यां समवेत घेण्यात आली. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही.पी. सांडूर मराठी विभागाचे प्रमुख डॉ. बी. एस. गायकवाड, प्रा. एस.एन.दिवे व इतर प्राध्यापक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाची वर्तमानपत्रानी घेतलेली दखल




लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात “समाज जीवनाचा भाष्यकार- आण्णाभाऊ साठे” या विषयावर भूमिका मांडताना प्रो.डॉ.भगवानराव वाघमारे. मंचावर उपस्थित मराठी विभाग प्रमुख डॉ.बी.एस.गायकवाड




लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी निमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एन. कोलपूके, प्राध्यापक व विद्यार्थी.